दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २८८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१२ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# पनवेल महापालिकेच्या उपमहापौरपदी सीताताई पाटील

## स्थायी समिती सभापतीपदी ॲड.नरेश ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्षेत्र समिती अ, ब, क, ड सभापती तसेच उपमहापौर, स्थायी समिती सभापती व महिला व बालकल्याण समिती सभापती पदाच्या निवडणुका आज झाल्या. यामध्ये उपमहापौरपदी सीताताई पाटील यांची निवड झाली. स्थायी समिती सभापतीपदी नरेश ठाकूर यांची बिनविरोध निवड झाली. महिला –बालकल्याण सभापतीपदी हर्षदा उपाध्याय यांची बिनविरोध निवड झाली. प्रभाग समिती 'अ'च्या सभापतीपदी संजना कदम यांची बिनविरोध निवड झाली. प्रभाग समिती 'ब'च्या सभापतीपदी प्रमिला पाटील यांची निवड झाली. प्रभाग समिती 'क'च्या सभापतीपदी अरुणा भगत यांची निवड झाली. प्रभाग समिती 'ड' सभापतीपदी वृषाली वाघमारे यांची बिनविरोध निवड झाली.

आज आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात विभागीय आयुक्तांच्या आदेशान्वये



पिठासीन अधिकारी (जिल्हाधिकारी) डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक झाली. यावेळी आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त डॉ.वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, सचिव तिलकराज खापर्डे उपस्थित होते. ही विशेष बैठक विहीत सामाजिक अंतर राखून व आरोग्य विषयक निकषांचे काटेकोर पालन करून आयोजित करण्यात आली. नियुक्त झालेल्या सर्व सदस्यांचे जिल्हाधिकारी आणि आयुक्त यांनी



देऊन अभिनंदन केले.

उपमहापौर पदासाठी सीताताई पाटील यांनी भाजप मधून आणि प्रिती जॉर्ज यांनी शेकाप मधून अर्ज भरला होता. सदर पदासाठी दोन उमेदवार असल्याने मतदान घेऊन निवड प्रक्रिया घेण्यात आली. यामध्ये सीताताई पाटील यांना ५० मते तर प्रिती जॉर्ज यांना २७ मते पडली. २३ मते अधिक मिळवून सीताताई पाटील यांची उमहापौर पदी निवड झाली.तसेच स्थायी समिती सभापतीपदी नरेश ठाकूर यांची बिनविरोध निवड झाली. महिला –बालकल्याण सभापतीपदी हर्षदा उपाध्याय यांची बिनविरोध निवड झाली.

प्रभाग समिती 'अ'च्या सभापतीपदी संजना कदम यांची बिनविरोध निवड झाली.प्रभाग समिती' ब' च्या सभापतीपदी प्रमिला पाटील व प्रिया भोईर यांनी अर्ज केला होता. सदर पदासाठी दोन उमेदवार असल्याने मतदान प्रक्रिया घेऊन सदस्यांची निवड करण्यात आली. यामध्ये प्रमिला पाटील यांना १३ व प्रिया भोईर यांना ७ मिळाली. सहा मते अधिक मिळवून सभापती पदी प्रमिला पाटील यांची निवड झाली. प्रभाग समिती 'क'च्या सभापतीपदी अरुणा भगत यांची बिनविरोध निवड झाली. प्रभाग समिती 'ड' सभापतीपदी वृषाली वाघमारे यांची बिनविरोध निवड झाली.

# २० जानेवारीपूर्वी सिडको एमडी सोबत बैठक घेण्याचे पोलिसांचे कृती समितीला आश्वासन

## १३ जानेवारी रोजी होणारी भूमिपुत्र परिषद वाढत्या कोरोना प्रादुर्भामुळे मर्यादित स्वरूपात करण्याचा निर्णय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१३ जानेवारी रोजी होणारी भूमिपुत्र परिषद वाढत्या कोरोना प्रादुर्भामुळे मर्यादित स्वरूपात करण्याचा निर्णय कृती समितीद्वारे जाहीर करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती देताना समिती तर्फे सांगण्यात आले की, लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती आणि पोलीस प्रशासन यांची बैठक पार पडली. या बैठकीस समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त सोनावणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादमाने, माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, जे. डी. तांडेल, गुलाब वझे, संतोष केणे, रुपेश धुमाळ, राजेश गायकर, दीपक म्हात्रे, विनोद म्हात्रे, व इतर पदाधिकारी उपस्थित होते. विमानतळ बाधित २७ गावांवर होणाऱ्या सिडकोच्या अन्यायाबाबत कृती समितीने चर्चा केली. या बैठकीत कोरोना महामारीचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता हे आंदोलन करू नये अशा सूचना व आवाहन पोलिस प्रशासनाने कृती समितीला केले. यावेळी पोलिसांनी या प्रश्नासंबंधी सिडको व्यवस्थापकीय सचांलकाबरोबर २० जानेवारी पूर्वी बैठक घेण्याचे आश्वासित केले. यावेळी कृती समितीने सिडको व्यवस्थापकीय सचांलकाबरोबर भूमिपुत्रांच्याबाबतीत प्रश्न मार्गी न लागल्यास २४ जानेवारी रोजी काम बंद आंदोलन करणार असल्याचे पोलीस प्रशासनाला सांगितले आहे.

मात्र १३ जानेवारीला लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीदिनी कोल्ही कोपर येथे होणारी भूमिपुत्रांची निर्धार परिषद कोविड चा प्रोटोकॉल पाळून मर्यादित स्वरूपात करण्याची कृती समितीने जाहीर केले. या परिषदेला पनवेल उरण विभागातील प्रमुख कार्यकर्ते व विमानतळ बाधित २७ गावचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याचे कृती समितीतर्फे कार्याध्यक्ष प्रशांत ठाकूर यांनी जाहीर केले. करोनाच्या मोठ्या स्वरूपाच्या लाटेमुळे परिषदेचे स्वरूप बदलण्यात आले असले तरी १३ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता एकाच वेळेला दिबांची जयंती आपापल्या गावागावांमध्ये,विभागामध्ये साजरी होईल.त्यानंतर प्रमुख कार्यकर्ते कोल्ही कोपर येथे येतील असे ठरले आहे. तसेच सिडको व्यवस्थापकीय सचांलकाबरोबर होणाऱ्या बैठकीत भूमिपुत्रांच्याबाबतीत प्रश्न मार्गी न लागल्यास २४ जानेवारी रोजी काम बंद आंदोलन करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# एमआयडीसी विरोधी आंदोलनाची पुढील दिशा गडबच्या बैठकीत ठरणार : आ.जयंत पाटील



**दै.रायगड नगरी । पेण**

आमदार जयंत भाई पाटील यांनी शेतकरी मोर्चात सहभागी होऊन जिल्हाधिकारी यांच्या कडे शेतकऱ्यांचा नियोजित डोलवी एमआयडीसी प्रकल्पास असलेला विरोध मांडला तसेच विधिमंडळ अधिवेशनात सरकार समोर शेतकऱ्याची बाजू मांडताना येथील विकास स्थानिकांना विश्वासात घेवून येथील नैसर्गिक साधन संपत्तीचा अभ्यास करून केला जावा असे नमूद केले आहे. त्यामुळे पेण येथील शेतकऱ्यांच्या विरोधापुढे राज्य सरकार नरमणार असल्याची शक्यता वर्तविली जात असून एमआयडीसी विरोधी आंदोलनाची पुढील दिशा गडबच्या बैठकीत ठरणार असल्याचे शेकाप आमदार जयंत पाटील यांनी सांगितले.

प्रस्तावित डोलवी एमआयडीसी संघर्ष समितीच्या वतीने ११ गावातील शेतकरी व ग्रामस्थांचा एमआयडीसी भुसंपादन रद्द करावे या प्रमुख मागणीसह व खारेपाण्याने भिजलेल्या शेतीची नुकसान भरपाई मिळावी, जेएसडब्लु कंपणी मुळे होणारे प्रदूषण व पर्यावरनाचाऱ्हास यावर नियंत्रण असावे. व इतर मागण्या घेवून अलिबाग येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांनी विराट मोर्चा काढला होता. बाधित ११ गावच्या शेतकऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी पेण रोहा तालुक्यातील अनेक शेतकरी तशेच ग्रामस्थ विशेषता कासु विभागातील शेतकरी व ग्रामस्थ यांनी काळाची पावलं ओळखून मोठ्या प्रमाणात मोर्चात सामील होऊन पाठींबा दिला. या मोर्चात अनेक राजकीय व सामाजिक क्षेत्रा–तील मान्यवरांनी हजेरी लावून पाठींबा दर्शविला होता. त्यामुळे आमदार जयंत पाटील यांची शेतकरी प्रतिनिधीनी सदिच्छा भेट घेतली.

यावेळी बोलताना आमदार जयंत पाटील म्हणाले की, मी तुमच्या सोबत आहे, या भागाच्या विकासाकरिता सर्वांनी .../२

# पनवेल परिसरात कोल्ह्याचा मुक्त वावर ; ८ ते १० जण जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील ग्रामिण भागात कोल्ह्याचा मुक्त संचार होत असून, त्याने आत्तापर्यत्त ८ ते १० जणांना जखमी केल्याची घटना घडली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भितीचे वातारण पसरले आहे.

मोसारा, मानघर, कुंडेवहाळ व पनवेल परिसरातील ग्रामिण भागातील गावांमध्ये कोल्ह्याचा मुक्त वावर होत आहे. या कोल्ह्याने आत्ता पर्यत्त जवळपास ८ ते १० जणांना चावा घेऊन जखमी केले असून, यामध्ये लहान मुलीचाही समावेश आहे. जखमींनी उपजिल्हा रुग्नालयात उपचारासाठी धाव घेतली आहे.

दरम्यान काही जागरुक ग्रामस्थांनी या बाबतची माहिती वन विभाग व संबधीत पोलिस ठाण्याला दिली आहे. हा एकच कोल्हा सर्वत्र फिरत आहे का कोल्ह्यांची टोळी फिरतेय वन खात्यासमोर आवाहन आहे. तरी नागरीकांनी बाहेर फिरताना काळजी घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.



## संक्षिप्त...

### भाजपचे १३ आमदार राजीनामा देणार : खा.शरद पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपचे १३ आमदार पक्षाला सोडचिठ्ठी देणार असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी केला. पुढील काही दिवसांमध्ये भाजपमधील नेते दररोज पक्ष सोडतील. यामध्ये भाजपच्या १३ आमदार आणि काही ज्येष्ठ नेत्यांचा समावेश असल्याचे पवार यांनी सांगितले. ते मंगळवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकारपरिषदेत बोलत होते. या पत्रकारपरिषदेत शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा समजावादी पक्ष आणि इतर लहान पक्षांसोबत मिळून उत्तर प्रदेशची निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले. उत्तर प्रदेशातील चित्र बदलत असून तिथे परिवर्तन होणार आहे. लोकांना बदल हवा आहे. स्वामी प्रसाद मौर्य यांनी भाजपचा राजीनामा दिला ही तर सुरुवात आहे. पुढील काही दिवसांत भाजपचे आणखी नेते परिवर्तनाच्या प्रक्रियेत सामील होतील. दररोज एक नवा चेहरा पक्ष सोडेल, असे शरद पवार यांनी म्हटले.

# पनवेलमधील कोरोना रुग्णांची माहिती हवीच : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात कोरोनाच्या तिसऱ्या लाटेने शिरकाव केला आहे. दररोज रुग्णसंख्येत किमान एक हजाराने भर पडत आहे. सध्याच्या घडीला सुमारे सहा हजार सक्रिय रुग्ण असताना पालिकेच्या माध्यमातून दैनंदिन अहवालातून रुग्णांची संक्षिप्त माहिती हटविण्यात आल्याने विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी थेट पालिका आयुक्तांना याबाबत पत्र लिहून दैनंदिन अहवालात रुग्णांची संक्षिप्त माहिती देण्याची मागणी केली आहे.



कोविड रुग्ण तसेच विलगीकरणात राहणाऱ्या नागरिकांना शासनाने नियमावली तयार केली आहे. या नियमांचे सर्वत्र पालन होते असे नाही. अशा परिस्थितीत आपल्या शेजारी अथवा आपल्या परिसरातील ईमारतीमध्ये किती रुग्ण संख्या आहे, याबाबत प्रत्येकाला माहिती असणे गरजेचे आहे. यापूर्वी पालिकेमार्फत दैनंदिन कोरोना अहवालात पालिका क्षेत्रातील रुग्णांसह, त्यांचा पत्ता, शहर, ईमारतीची माहिती दिली जात होती. रुग्ण संख्या वाढत असल्याने मागील काही दिवसांपासून पालिकेने रुग्णांची संक्षिप्त माहिती देणे बंद केले आहे. यामुळे नागरिक गोंधळात आहेत. आपल्या शेजारील रुग्णांची माहिती आपणास मिळाल्यास अशा ठिकाणी संपर्क टाळण्यात येऊन संबंधित नागरिकांना सोपे होईल. बहुतांशी रहिवासी कोरोनाचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्यानंतर आपली माहिती दडविण्याचा प्रयत्न करत असतात. त्यातच पालिकेने अशा रुग्णांची माहिती देणेच बंद केल्याने यामुळे कोरोनाची साथ आणखी पसरण्याची भीती विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी व्यक्त केली आहे. याबाबत पालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी पुढाकार घेऊन पुन्हा कोरोना रुग्णांची संक्षिप्त माहिती पालिकेच्या दैनंदिन कोविड अहवालात समाविष्ट करावी, अशी मागणी प्रीतम म्हात्रे यांनी केली आहे.

## पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली

# ५% दिव्यांग कल्याण निधी सनियंत्रण जिल्हास्तरीय समितीची बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

शासनाच्या सूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्व–उत्पन्नाचा ५% निधी दिव्यांग कल्याणासाठी राखून ठेवणे अनिवार्य आहे. त्यासाठी राखून ठेवलेल्या निधीचे नियंत्रण करण्यासाठी पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीची बैठक आज मंगळवार, दि.११ जानेवारी २०२२ रोजी पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात संपन्न झाली.



या बैठकीस रायगड जिल्हा परिषद समाज कल्याण समिती सभापती दिलीप भोईर, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के–पाटील, जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी गजानन लेंडी, जिल्हा परिषद मुख्य लेखा व वित्त अधिकारी भगवान घाडगे तसेच अशासकीय सदस्य साईनाथ पवार, रंजना सत्वे, दिगंबर पवार आदि मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीत सन २०२१–२२ मध्ये जिल्हा परिषद दिव्यांग कल्याण निधीच्या नियमित योजनांचा व अनुशेष रक्कमेचा पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी आढावा .../२

## वाळवीग्रस्त हनुमान कोळीवाड्याच्या पुनर्वसन करण्यात जेएनपीटीचा चालढकलपणा

# ग्रामस्थ परत एकदा जेएनपीटीत येणारी जहाजे रोखण्याच्या तयारीत

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटीमुळे विस्थापित झालेल्या हनुमान कोळीवाडा गावाचे पुनर्वसन करण्यात चालढकलपणा करण्यात येत असल्यामुळे हनुमान कोळीवाडा ग्रामस्थ पुन्हा एकदा जेएनपीटीचा समुद्र मार्ग अडविण्याच्या तयारीत आहेत. हनुमान कोळीवाडा गाव पुनर्वसनाबाबत ३० डिसेंबर २०२१ ला जेएनपीटीचे चेअरमन संजय सेठी, व्हा.चेअरमन उन्मेष वाघ आणि उपजिल्हाधिकारी पुनर्वसन सुषमा सातपुते यांच्यात बैठक झाली होती. त्या बैठकीत कस्टम वसाहतीजवळील जेएनपीटीच्या विकसित जमिनीत शासनाच्या मापदंडानुसार ७१० गुंठ्यात २५६ भूखंड व नागरी सुविधा देण्याचे मान्य केले होते.

त्यासाठी आराखडा बनविण्यासाठी प्रशासनाने ग्रामस्थाकडून आठ दिवस मुदत मागीतली होती. मात्र आठ दिवसानंतर देखिल उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन यांच्याकडे जेएनपीटीने आराखडा पाठविला नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.त्यामुळे हनुमान कोळीवाडा ग्रामस्थ जेएनपीटीत समुद्र मार्गे येणारी जहाजे रोखून धरणार आहेत. जेएनपीटीमध्ये ज्या समुद्री चॅनलमधून जहाजे येतात त्या चॅनलमध्ये आपल्या होड्या आडव्या टाकून हे अनोखे आंदोलन करण्यात येणार आहे.

यापूर्वी या ग्रामस्थानी २६ फेब्रुवारीला अशा प्रकारचे चॅनल बंदआंदोलन करून जेएनपीटीचा समुद्रातील मार्ग रोखून धरला होता. त्यावेळी खासदार सुनिल तटकरे यांच्या मध्यस्थीमुळे तसेच रायगड जिल्हा .../२

# कुष्ठरुग्ण बांधवांच्या आठवणीत ऋणानुबंध स्नेहमिलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन येथे कुष्ठरुग्ण बांधवांच्या आठवणीत ऋणानुबंध स्नेहमिलन साजरे करण्यात आले. शांतिवनसोबत असलेले नाते वृद्धिंगत होण्यासाठी ऋणानुबंध यांच्यामार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्रातून वेगवेगळ्या ठिकाणाहून ६० पेक्षा अधिक कार्यकर्ते, कुष्ठमित्र उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ज्या ज्या व्यक्तींनी या शांतीवन उभारण्यासाठी योगदान दिले त्यांना अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर साने गुरुजींची 'खरा तो एकची धर्म' ही प्रार्थना झाली. सुरुवातीला आलेल्या कुष्ठरुग्ण बांधवांचा यावेळी शाल श्रीफळ सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. हे काम करताना सुरुवातीला किती त्रास झाला याबद्दल आपले मत व्यक्त करताना मनोगत व्यक्त करताना कुष्ठरुग्ण बांधवांनी सांगितलेल्या आठवणी ऐकून उपस्थितांची मनही हेलावली. सुरुवातीला आजूबाजूच्या गावातील लोकांचाही त्रास होता; परंतु नंतर गावातील लोकांच्या सहकार्याने व शांतीवनच्या सहकार्याने गावातील लोकांनी कशाप्रकारे कामे उभी केली याची माहिती यावेळी उपस्थितांनी दिली. बांधवांसोबत सुरुवातीला कार्यकर्ता म्हणून दमयंती डोंगळे, अण्णा डोंगळे या मंडळींनी गावा-तील लोकांचा आणि कुष्ठ बांधवांचा एकोपा आणण्यासाठी खूप मोलाचे योगदान दिले त्या दमयंती डोंगळे यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

दिवसभरात उपस्थितांपैकी प्रत्येक कार्यकर्त्याने आपले मनोगत व्यक्त केले. यातून शांतीवनात आपण काम करत असताना आलेले अनुभव व आज आपण ज्या ठिकाणी आहोत त्या ठिकाणाहून शांतीवनच्या ग्राम विकास, आरोग्य, शिबिरे, शैक्षणिक कार्य तसेच इतर कार्यात आपण कोणत्या प्रकारची मदत करू शकतो याची माहितीही उपस्थितांनी दिली. चिंचवलीचे माजी उपसरपंच रमेश पाटील यांनी यावेळी शांतीवनसाठी २५ हजाराची देणगी जाहीर केली. शांतीवनातच काम करून शांतीवनशी नाळ जोडून ठेवलेले कार्यकर्ते साईनाथ भोपी, यशवंत बिडये, संदीप डोंगळे, फतीमा फ्रोज, राजेंद्र वानखडे, भगवान बडगुजर, विनोद पाचघरे या सर्वांनी एकत्रित येत ऋणानुबंध या ग्रुपची स्थापना केली व त्या माध्यमातून हा कार्यक्रम घेण्यात आला होता. कार्यक्रमासाठी नि.स. शांतीवन संचालित बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्र यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला संस्थेच्या अध्यक्षा रक्षाताई मेहता पदाधिकारी आदी मंडळी उपस्थित होती.

# कुबेर मोटर्स शोरुमच्या कर्मचाऱ्यांनी केली १ लाख १४ हजार रुपये किंमतीची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील करंजाडे येथील कुबेर मोटर्स शोरुममध्ये काम करणाऱ्या इसमांनी गाडी खरेदी करणाऱ्या इसमाची जवळपास १ लाख १४ हजार २०५ रुपयाची फसवणूक केल्याची घटना घडली आहे.

संतोष नाईक (४५) यांनी करंजाडे येथे कुबेर मोटर्स शोरुममधून ८३ हजार रुपये किंमतीची होंडा शाईन दोन चाकी गाडी घेण्यासाठी तेथे गेले असता त्यांच्याकडून ६० हजार रुपये रोख रक्कम घेतली गेली व राहिलेल्या रकमेचे लोन करून देतो असे सांगून त्यांच्या नावे एकूण १ लाख १४ हजार २०५ रुपयाचे लोन पास करून सदरची रक्कम त्या ठिकाणी असणाऱ्या ३ ते ४ कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी वापरुन संतोष नाईक यांची फसवणूक केली आहे. तसेच अशा प्रकारे तेथील कर्मचाऱ्यांनी ३० ते ४० लोकांची फसवणूक केली असल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आल्यानंतर त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चित्रपट अविरतचे पोस्टर प्रदर्शन

**दै.रायगड नगरी । उरण**

जय हनुमान कलामंच कोंढरीचे नृत्य दिग्दर्शक तथा कलाकार मिलिंद भाऊ म्हात्रे आणि राजेश पवार निर्मित आणि मिलिंद म्हात्रे लिखित व दिग्दर्शकीत आगामी अविरत या मराठी चित्रपटाच्या पोस्टरचे प्रदर्शन नुकताच कोंढरी गावचे आराध्य दैवत हनुमान मंदिरात मिलिंद म्हात्रे यांचे आई वडील यांच्या हस्ते कोविडचे सर्व नियम बाळगून पार पडला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी करंजा मच्छिमार सोसायटीचे माजी चेअरमन शिवदास नाखवा हे होते तर प्रमुख उपस्थिती निर्माते राजेश पवार, चाणजेचे सरपंच मंगेश थळी, विद्यमान सदस्य अमितजी भगत, व्यंकटेश म्हात्रे, माजी सदस्य महेश म्हात्रे,पल्लवी ठाकूर, गीतकार विश्वास पाटील,कलाकार अरूण म्हात्रे, आकाश भोईर, सुरेश चव्हाण, हर्षवर्धन धामणकर, सोमनाथ ठाकूर, विनोद म्हात्रे, दिपा ठाकूर ,विद्या ठाकूर तसेच मिलिंदजी म्हात्रे यांचे सर्व शिष्यगण व त्यांचे आईवडील उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी कोंढरीसारख्या गावातून वडापावची गाडी चालवून उदरनिर्वाह करणारे आईवडीलांचा मुलगा एका सिनेमाची निर्मिती करतोय याबद्दल मिलिंदजी यांचे कौतुक आणि आगामी अविरत हा सिनेमा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रसिद्ध होवो या सदिच्छा दिल्या.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**अलिबाग सा.बां.विभाग, अलिबाग**
**पिन कोड-४०२२०१**

**ई-मेल पत्ता :-** alibag.ee@mahapwd.com **दूरध्वनी/फॅक्स क्रमांक :-** (०२१४१) २२२०८४/२२५०९६

## ई-निविदा सूचना क्र.२४ सन २०२१-२०२२

कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून (जे निविदेत असलेल्या अटी व शर्ती पूर्ण करतील त्यांचे कडून) ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील उद्धरकुंभारघर महागांव चंदरगाव हातोंड गोंदाव ते रा.म.५४८ (अ) रस्ता प्रजिमा ४० कि.मी. ०/०० ते ७/००, १९/४०० ते २१/४०० व कि.मी. ३३/०० ते ३४/०० लांबीमध्ये सुधारणा करणे. | ५,७०,७८,८६९/- |
| २ | रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील नवीन ग्रंथालय व प्रशिक्षण इमारत बांधणे | ८,६७,१९,८६०/- |
| ३ | रायगड जिल्ह्याातील सुधागड तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय मुख्य इमारत व कर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम करणे. | १२,१६,८८,३०९/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक १२/०१/२०२२ (स.१०.००) ते दिनांक ०५/०२/२०२२ (सं.१८.००)
निविदापूर्व बैठक :- मा.मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दिनांक १८/०१/२०२२ रोजी दु.३.०० वा.
ई-निविदा उघडणे :- दिनांक ०९/०२/२०२२ (दु.३.०० वा.) (अधिक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवीमुंबई)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) http://mahapwd.com
२) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अलिबाग कार्यालयातील सुचना फलक.

जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/१२/२०२२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, अलिबाग-४०२२०१
दिनांक : ०४/०१/२०२२

**सही/-**
**(ज.ई.सुखदेवे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.विभाग, अलिबाग,**
**जि.रायगड**

# अभ्यास व संशोधन केंद्राच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार होणार उपलब्ध : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



भविष्यात भावी पिढीला रायगड जिल्ह्यात पक्षी अभ्यास व संशोधन केंद्र उपलब्ध होणार आहे, त्यामुळे साहजिकच स्थानिकांना देखील रोजगार उपलब्ध होईल, असे प्रतिपादन पालकमंत्री अदिती तटकरे यांनी किहीम येथे केले. किहीम येथील जुन्या जिल्हा परिषद शाळेत डॉ. सलीम अली पक्षी अभ्यास व संशोधन केंद्राचे भूमीपूजन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते संपन्न झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा कु.योगिता पारधी, ॲड. आस्वाद पाटील, कृषी व पशूसंवर्धन सभापती बबन मनवे, समाज कल्याण सभापती दिलीप भोईर, सुरेंद्र म्हात्रे, सौ.मानसी दळवी, बाजीराव परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, उप वनसंरक्षक आशिष ठाकरे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, बी.एन.एच.एस. चे संचालक बिवाश पांडव, शिक्षणाधिकारी ज्योत्स्ना शिंदे, अलिबाग पंचायत समिती सदस्य समिहा पाटील, किहीम ग्रामपंचायत सरपंच सीमा थळे, प्रमोद ठाकूर, अलिबाग वनपरिक्षेत्र अधिकारी विकास तरसे शंतनू कुवेसकर, श्री.काका ठाकूर, उपसरपंच, ग्रामस्थ, पक्षी मित्र आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री कु.तटकरे पुढे म्हणाल्या, किहीम येथे साकारण्यात येणाऱ्या अभ्यास व संशोधन केंद्रात डॉ. सलीम अली यांचा जीवनप्रवास व त्यांचे उल्लेखनीय कार्य हे पर्यटकांना, अभ्यासकांना अनुभवता यावे याकरिता ग्रंथ तसेच आभासी वास्तव या अत्याधुनिक माध्यमाचा वापर करण्यात येणार आहे. तसेच, या प्रकल्पासाठी जिल्हा परिषदेची शाळा, इमारत व लगतच्या जागेत पथदिवे, पाणी पुरवठा, रस्ते आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रसिद्ध पक्षी वैज्ञानिक डॉ. सलीम अली यांचे वास्तव्य जिथे होते व जिथून त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात झाली, त्याठिकाणी आज पक्षी अभ्यास व संशोधन केंद्र होत आहे. या ठिकाणी भेट देणारे विद्यार्थी व पर्यटकांना इथे आल्यावर एक वेगळाच अनुभव मिळेल हे मात्र निश्चित आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, या कामात ५० टक्के वाटा हा जिल्हा परिषदेचा आहे. जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्याचा आपला प्रयत्न आहे. फणसाडमध्ये देखील आपण लक्ष केंद्रित करीत आहोत, तर कर्नाळा पक्षी अभयारण्यासाठी देखील मोठा निधी देण्यात आला आहे. या पक्षी अभयारण्यासाठी जिल्हा नियोजनच्या माध्यमातून ५५ लाख तर प्रादेशिक पर्यटन मधून १ कोटी २० लाख एवढा निधी उपलब्ध करण्यात येत आहे. अलिबाग परिसरामध्ये पर्यटकांचा मोठ्या प्रमाणात वावर असतो. अनेकदा अलिबाग, किहीम, मुरुड, काशीद या ठिकाणी पर्यटक येत असतात. तेव्हा हे पक्षी अभ्यासकेंद्र हे पर्यटकांसाठी देखील आकर्षण असेल. यासोबत रेवस रेड्डी कोस्टल रोड होत असताना त्याला जोडून असलेले रस्ते यांचादेखील त्यात समावेश व्हावा, अशी विनंती पालकमंत्री या नात्याने मी शास-नाला केली होती. त्यानुसार ९३ ठिकाणांचा समावेश यात केला आहे. अलिबाग परिसरात येणारा एखादा पर्यटक जास्त दिवस इथे कसा वास्तव्य करेल यासाठी आपण प्रयत्न करतोय, असे देखील त्यांनी सांगितले.

१२ नोव्हेंबर रोजी डॉ.सलीम अली यांचा वाढदिवस असतो. यावर्षी महाराष्ट्र शासनाने १२ ते १७ नोव्हेंबर या दरम्यान पक्षी सप्ताह आयोजित करण्यात आला होता. त्यामुळे जागतिक कीर्तीचे पक्षी वैज्ञानिक डॉ. सलीम अली यांच्या कारकिर्दीची सुरूवात असलेल्या अलिबाग किहीम येथे त्यांच्या नावाने पक्षी संशोधन व अभ्यास केंद्र असावे, याकरिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी तसेच वन विभाग, रायगड जिल्हा परिषद यांनी संयुक्त पुढाकार घेतला.

अलिबाग वन विभागाचे उपवनसंरक्षक आशिष ठाकरे यांनी यावेळी माहिती दिली की, यासोबत पक्षी पर्यटन कसे वाढेल यासाठी आपले प्रयत्न असतील. किहीम मध्ये नव्याने उभारलेले हे पक्षी अभ्यास केंद्र वाढण्यासाठी तसेच मोठ्या प्रमाणात प्रचार प्रसार होण्यासाठी पर्यटन केंद्र बनविण्यासाठी अजून काय करता येईल यासाठी बीएचएनएस, जिल्हा परिषद व जिल्हा प्रशासन यांचे सहकार्य घेऊन वन विभाग त्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करील.

डॉ.सलीम अली यांनी जिथून आपल्या कारकिर्दीची सुरूवात केली होती त्याच किहीममध्ये आज डॉ.अली यांच्या नावाने पक्षी अभ्यास केंद्र होणे ही अभिमानाची बाब आहे. डॉ. अली हे १४ वर्षाचे असताना त्यांनी एक चिमणी मारली होती आणि ती वेगळी वाटल्याने त्यांनी तिच्याबद्दल अधिक माहिती घेत बीएनएचएस पर्यंत पोहचले. त्यांनतर तिथूनच एक पक्षी वैज्ञानिक म्हणून ते घडले. डॉ.अली जोवर होते तोवर ते बीएनए-चएस सोबत राहिले. तेव्हा किहीम येथे होणाऱ्या या केंद्राला बीएनएचएस सर्वतोपरी तांत्रिक मदत करेल. तसेच यानंतर देखील या केंद्राला लागणारी सर्व मदत बीएनएचएस करेल, अशी ग्वाही यावेळी संचालक बिवंश पांडव यांनी दिली.

## ग्रामपंचायत सोनारी
### मु.सोनारी, पो.जेएनपीटी टाऊनशिप, ता.उरण, जि.रायगड
### निविदा सूचना

ग्रामपंचायत सोनारी यांजकडून जाहिररित्या कळविण्यात येते की, ग्रामपंचायत सोनारी येथील स्वच्छ भारत अभियान टप्पा २ रा.जि.प. अलिबाग अंतर्गत विकासकामे करणे आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी आपल्या कामांच्या निविदा ग्रामपंचायत कार्यालय सोनारी येथे दि.१७/०१/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. सदरच्या निविदा दि.१७/०१/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता उघडल्या जातील. उघडलेल्या निविदा स्वीकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.सरपंच ग्रामपंचायत सोनारी यांचा राहील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|
| १ | सांडपाणी व घनचकरा व्यवस्थापन | ८५७६६/- | स्वच्छ भारत अभियान टप्पा २ राजिप अलिबाग |

अटी व शर्ती :-
१) सदरचे कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२) ग्रामपंचायतीकडे विनंती केल्यास व रु.२५/- भरणा केल्यास अंदाजपत्रकाची प्रत देण्यात येईल.
३) निविदा फॉर्म किंमत रु.१००/- ना परतावा समजावी
४) नियमाप्रमाणे आयकर व व्यवसायकर भरावा लागेल.
५) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी व इतर ठेकेदारांचा विचार केला जाईल.
६) निविदा मंजूर केल्यास रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून घ्यावा लागेल.
८) इसारा व सुरक्षा अनामत ९० दिवसाने कामाचा दर्जा पाहून परत मिळेल.
९) सदरचे कामाचे ॲडव्हान्स रक्कम देता येणार नाही. जसे काम होईल त्याप्रमाणे मुल्यांकनानुसार बिल अदा केले जाईल.
१०) वर्कऑर्डर प्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास प्रथम ठेकेदारास जबाबदार रहावे लागेल.
११) वरील सर्व अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत सोनारी**
**ता.उरण, जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत सोनारी**
**ता.उरण, जि.रायगड**

## ग्रामपंचायत रानसई
### मु.रानसई, पो.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड
### निविदा सूचना

ग्रामपंचायत रानसई यांजकडून जाहिररित्या कळविण्यात येते की, ग्रामपंचायत रानसई येथील विकासकामे करणे आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी आपल्या कामांच्या निविदा ग्रामपंचायत कार्यालय रानसई येथे दि.२०/०१/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. सदरच्या निविदा दि.२०/०१/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता उघडल्या जातील. उघडलेल्या निविदा स्वीकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.सरपंच ग्रामपंचायत रानसई यांचा राहील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|
| १ | सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन | १५८१०१/- | स्वच्छ भारत अभियान टप्पा २ राजिप अलिबाग |
| २ | मार्गाची वाडी नळ कनेक्शन व पाईप लाईन | १५००००/- | १५ वा वित्त आयोग |
| ३ | सागाचीवाडी नळ कनेक्शन व पाईप लाईन | १५१५३४/- | १५ वा वित्त आयोग |
| ४ | खैरकाठी / भुऱ्याचीवाडी नळ कनेक्शन व पाईप लाईन | २३७९२०/- | १५ वा वित्त आयोग |
| ५ | भुऱ्याचीवाडी विहिर दुरुस्ती | १७९९८९/- | १५ वा वित्त आयोग |

अटी व शर्ती :-
१) सदरचे कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२) ग्रामपंचायतीकडे विनंती केल्यास व रु.२५/- भरणा केल्यास अंदाजपत्रकाची प्रत देण्यात येईल.
३) निविदा फॉर्म किंमत रु.१००/- ना परतावा समजावी
४) नियमाप्रमाणे आयकर व व्यवसायकर भरावा लागेल.
५) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी व इतर ठेकेदारांचा विचार केला जाईल.
६) निविदा मंजूर केल्यास रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून घ्यावा लागेल.
८) इसारा व सुरक्षा अनामत ९० दिवसाने कामाचा दर्जा पाहून परत मिळेल.
९) सदरचे कामाचे ॲडव्हान्स रक्कम देता येणार नाही. जसे काम होईल त्याप्रमाणे मुल्यांकनानुसार बिल अदा केले जाईल.
१०) वर्कऑर्डर प्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास प्रथम ठेकेदारास जबाबदार रहावे लागेल.
११) वरील सर्व अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत रानसई**
**ता.उरण, जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत रानसई**
**ता.उरण, जि.रायगड**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## एमआयडीसी विरोधी आंदोलनाची पुढील दिशा गडबच्या बैठकीत ठरणार : आ.जयंत पाटील

एकत्र यावे. आजची तरुण पिढी सक्षम आहे. त्यांना विकास काय हे कळतेय. त्यामुळे विकासाची भाषा करणाऱ्यांनी स्थानिकांना काय हवयं ते पहिल्यांदा पाहावे. जेएसडब्लु या खाजगी कंपनी साठी होऊ घातलेला एमआयडीसी प्रकल्प रद्द करावा, या अगोदरच यातील काही गावांना सिडको आरक्षण पडलेलं असताना त्यात एमआयडीसी कसं आणता, या संपूर्ण विभागात आर झोन ची मागणी केल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. असं असताना सरकारने जर आपलं म्हणणं ऐकलं नाही तर मोठं जणआंदोलन उभारले जाईल. त्यासाठी लवकरच गडब येथे शेतकऱ्यांची बैठक घेवून पुढील रणनीती ठरवली जाईल. असे शेवटी त्यांनी सांगितले.

यावेळी शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, पंचायत समिती सदस्य प्रदिप म्हात्रे, शेतकरी कमिटी संयोजक के.जी.म्हात्रे, गजानन पेढवी, विजय पाटील, सीताराम चवरकर, सदानंद ठाकूर, परशुराम म्हात्रे, ॲड.देविदास म्हात्रे, प्रभाकर पाटील, एकनाथ म्हात्रे, के.पी.पाटील, दिलीप पाटील, दिनेश म्हात्रे, बळीराम कोठेकर, राजू पाटील, महेंद्र पाटील, प्रवीण म्हात्रे याच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## ५% दिव्यांग कल्याण निधी सनियंत्रण जिल्हास्तरीय समितीची बैठक संपन्न

घेतला. यावेळी त्यांनी दिव्यांगांना मूलभूत सोयी-सुविधा तसेच त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी नावीन्यपूर्ण योजना राबविण्याबाबत प्रशासनास सूचना दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांनी जिल्हा परिषदेमार्फत दिव्यांगांसाठी विविध उपक्रम राबविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातील, असे सांगितले. दिव्यांग कल्याणामध्ये रायगड जिल्हा परिषदेस यापूर्वीच भारत सरकारचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला असल्याने दिव्यांगांच्या कल्याणासाठी सातत्याने नव-नवीन उपक्रम राबविण्याबाबत आम्ही प्रयत्नशील असतो, असे या समितीचे अशासकीय सदस्य साईनाथ पवार व दिगंबर पवार यांनी माहिती दिली. सहाय्यक सल्लागार किशोर वेखंडे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.

## ग्रामस्थ परत एकदा जेएनपीटीत येणारी जहाजे रोखण्याच्या तयारीत

कलेक्टरांनी आणि पोलिसांनी हा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिल्यामुळे ते आंदोलन स्थगित करण्यात आले होते. मात्र वारंवार आश्वासन देवून ग्रामस्थांना शांत केले जाते.१९८४ ला जेएनपीटी वसविण्यात आली त्यावेळेला सर्व २५६ मच्छिमार कुटुंब येथून विस्थापित करण्यात आली. तेव्हा पासून हे लोक हनुमान कोळीवाडा गावात बोरी पाखाडी येथे विस्थापित करण्यात आली. मात्र ज्या ठिकाणी त्याचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न झाला ती जागा दुषितअसल्याने संपूर्ण गावातील घरे वाळवीने पोखरली गेली. शिवाय हे पुनर्वसन शासनाच्या निकषाप्रमाणे करण्यात आले नव्हते. त्यामुळे हे लोक अनेक समस्यांचा सामना करत आहेत. माजी नौवहन मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे वर्तमान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत अनेक बैठकी होऊन देखील, लोक न्यायापासून वंचित आहेत.

त्यामुळे शासन व जेएनपीटी प्रशासन ग्रामस्थांविरोधात फसवणूक व कटकारस्थान रचत असून पोलिसांनी याअधिकाऱ्यांवर कारवाई करावी नाही तर येत्या आठ दिवसांत पुन्हा एकदा घारापुरी ते मोरा या जेएनपीटीच्या चॅनलमध्ये मासेमारी बोटी नांगरून मुलाबाळांसमवेत शांततेत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# विजय भोईर यांनी मिळवून दिला दिव्यांग महिलेला न्याय

**दै.रायगड नगरी । उरण**

जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी अनेक गोरगरिबांना न्याय मिळवून दिला आहे. ते नेहमी निस्वार्थी वृत्तीने अनेकांना मदत करतात याचेच जिवंत उदाहरण म्हणजे उरण तालुक्यातील भेंडखळ गावातील दिव्यांग कु. छाया हरी ठाकूर हिला मिळवून दिलेला न्याय.

सविस्तर वृत्त असे की हरी पुंडलिक ठाकूर राहणार -भेंडखळ हे कुंडेगाव जिल्हा परिषद शाळेतून मुख्याध्यापक पदावरून निवृत्त झाल्यानंतर अवघ्या २ वर्षातच त्यांचा मृत्यू झाला. त्यांची पत्नी कृष्णाबाई हरी ठाकूर यांना स्वर्गीय मुख्याध्यापक हरी पुंडलिक ठाकूर यांची पेन्शन सुरु झाली. मात्र काही वर्षातच कृष्णाबाई यांचे निधन झाले. पती पत्नी यांचा दोघांचाही मृत्यू झाला. त्यांना चालू असलेली पेन्शन बंद झाली. ही पेन्शन त्यांची मुलगी छाया हरी ठाकूर राहणार -भेंडखळ ही दिव्यांग व अविवाहित असल्याने तिला ते पेन्शन व इतर सेवा सवलती मिळाव्यात अशी जनतेतून व ठाकूर कुटुंबियांकडून मागणी होऊ लागली. पेन्शन व इतर सेवा सवलती मिळाव्यात यासाठी दिव्यांग व अविवाहित असलेल्या छाया ठाकूर हिने प्रयत्न सुरु केले.वडिलांचे पेन्शन व सेवा सवलती मिळाव्यात यासाठी तीने उरण पंचायत समिती येथे वेळोवेळी पाठपुरावा केला.मात्र तिला दाद मिळाली नाही. तेंव्हा छाया ठाकूर हिने त्यांचे भाऊ नरेश ठाकूर यांच्याशी संपर्क साधला. व तीने ही समस्या जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांच्या कानावर ही समस्या टाकण्यास सांगितली. लगेचच नरेश ठाकूर यांनी ही समस्या विजय भोईर यांच्या कानावर टाकली. विजय भोईर यांनी हा प्रश्न हाती घेतला. रायगड जिल्हा परिषदेत सर्व शासकीय अधिकारी, जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्यासमोर ही समस्या मांडली. छाया ठाकूर ही ७०% अपंग व अविवाहित आहे. तीचे आईवडीलांचे निधन झाले आहे. तिला कोणाचाच आधार नसल्याने तीच्या वडिलांचे पेन्शन व इतर सुविधा दिव्यांग छाया ठाकूर हिला मिळावेत अशी मागणी विजय भोईर यांनी जिल्हा परिषदेत केली. कायद्यानुसार ज्या व्यक्तीचे आई वडीलांचे निधन झाले असेल आणि त्यांचे अपत्य हे दिव्यांग व अविवाहित असेल तर कायद्याने आई किंवा वडिलांचे सर्व सेवा सवलती या त्या अपत्याला मिळणे बंधनकारक आहे. जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी संबंधित परिपत्रक (GR) दाखवून आपला शिवसेनेचा आक्रमकपणा दाखविला. शेवटी रायगड जिल्हा परिषदेने छाया ठाकूर यांना पेन्शन व इतर सेवा सवलती देण्याचे मान्य केले. तसे ठरावही जिल्हा परिषदेने मंजूर केले. शिवसेना गोरगरिबांच्या नेहमी पाठीशी असते याचा प्रत्यय ठाकूर कुटुंबियांना आला असून छाया ठाकूर यांना जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांच्या मुळे पेन्शन मंजूर झाली. शिवाय २००७ सालापासूनची थकबाकी सुद्धा विजय भोईर यांनी मिळवून दिली आहे. सदर थकबाकी दिनांक ५/१/२०२२ रोजी तीच्या खात्यावर जमा सुद्धा झाली आहे.



# किल्ले रायगडावर पर्यटकांना नो एन्ट्री

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

राज्यात कोरोना आणि ओमीक्रोनने पुन्हा डोके वर काढले आहे. अशातच रायगडातही रोज हजारोच्या संख्येने रुग्ण सापडत आहेत. त्यामुळे नागरिकांची व जिल्हा प्रशासनाची चिंता वाढली आहे. वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर किल्ले रायगडवर पर्यटकांना येण्यास बंदी घालण्यात आली आहे. पुरातत्व विभागाने बंदीचे आदेश जारी केले आहेत. किल्ले रायगडावरील रोपवे ही पर्यटकांना बंद ठेवण्यात आला आहे. कोरोनाच्या या वाढत्या काळात शिवभक्त, व्यवसायिक यांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहेत. रायगड जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव हा झपाट्याने वाढत आहे. रोज हजाराच्या संख्येने रुग्ण वाढत आहेत. सद्यस्थितीत जिल्ह्यात ९ हजार पर्यत रुग्ण संख्या पोहचली आहे. जिल्ह्यात रात्रीची संचारबंदी तर दिवसा जमावबंदी लागू आहे. असे असले तरी पर्यटक हे आजही मोठ्या संख्येने पर्यटनासाठी येत आहेत. किल्ले रायगडवरही पर्यटक, शिवभक्त, अभ्यासक हे मोठ्या संख्येने येत असतात. मात्र कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे पुरातत्व विभागाने पर्यटकांना किल्ले रायगडावर येण्यास बंदी घातली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मोफत आधार कार्ड शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानमध्ये हॉटेल स्प्रिंग वुड येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मोफत आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले त्यास अनेकांनी हजेरी लावून हे शिबीर यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष राजेश दळवी, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा अध्यक्ष सागर जोशी, (रायगड जिल्हा सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष) तथा मा. नगराध्यक्ष अजय सावंत, स्वाती सुनील कुमार (महिला अध्यक्ष राषट्रवादी), वर्षा रॉड्रिग्ज (मा. नगरसेविका (मा.न.प.), मंगेश सकपाळ, स्नेहा संतोष चव्हाण, संदीप शेलार, शंतनु जमदाडे, किरण पेमारे, ऋषिकेश कोळी,संतोष शिंदे, निरज यादव यांसह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. तर या भव्य शिबिरास शिवसेनेचे संपर्क प्रमुख प्रसाद सावंत, उप शहर प्रमुख सागर पाटील, मा.नगराध्यक्ष विवेक चौधरी, नरेश काळे, कुलदीप जाधव, शकील पटेल, शिवसेना युवा सेनेचे श्रेयस गायकवाड, सिताराम शिंदे यांनी उपस्थिती दर्शवली.



# ऑनलाईन शाळांमुळे पालकांच्या चिंतेत भर

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

पुन्हा नव्याने कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता सुरक्षिततेच्या द्रुष्टीने शासनाने इ.१ ली ते ९ वी व ११ वी चे वर्ग बंद करण्याचा निर्णय घेतल्याने शाळा पुर्णतः बंद झाल्याने पालकांच्याही चिंतेत भर पडली आहे.

सुमारे दीड वर्षानंतर दीपावली सणानंतर सुरक्षिततेचे नियम पाळत हळूहळू सर्वत्र शाळा सुरू करण्यात आल्याने विद्यार्थी अभ्यासात रमले होते. ऑनलाईन शिक्षण थांबून प्रत्यक्षात अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थी सहभागी झाल्याने शैक्षणिक कार्य करताना शिक्षकांनाही दिलासा मिळाला होता.तर पालक वर्गही सुखावला होता. एकंदरीत परिस्थिती रूळावर आली असतानाच पुन्हा नव्याने कोरोनाचा प्रादुर्भाव हळूहळू वाढू लागल्याने अखेर शासनाने शाळाच बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाच्या या निर्णयाचे पालकांनी जरी सहमती दर्शवली असली तरी शाळाच बंद झाल्याने आपल्या मुलांच्या अभ्यासाबरोबरच त्यांच्या भविष्याची चिंता त्यांना सतावू लागली आहे. तर शिक्षकांना आपल्या निर्धारित वेळेत आपलासा शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण करणे व अन्य शैक्षणिक बाबींची पुर्तता करणे अत्यावश्यक असल्याने याकामी त्यांना ऑनलाईन प्रक्रियेचा मार्ग अवलंबवा लागत असल्याने विद्यार्थ्यांना ऑनलाईन शैक्षणिक प्रक्रियेत समाविष्ट केले जाते. अशावेळेस ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या प्रक्रियेकरिता मोबाईलची व्यवस्था होत नसल्याने मोठीच समस्या निर्माण होते. याशिवाय नेटवर्क समस्याही निर्माण होते. त्याचबरोबर विद्यार्थी एकदा मोबाईलमध्ये गुंतले की, अभ्यासाच्या नावावर मोबाईलवर गेम खेळणे किंवा अन्य मनोरंजक गोष्टीसाठी विद्यार्थी मोबाईल वापरित असल्याने तिथूनही पालकांची डोकेदुखी निर्माण होते. एकंदरीत ऑनलाईन शाळांमुळे पालकांच्या चिंतेत अधिक भर पडत असल्याचे पहावयास मिळत आहे.

---

अर्जदाराचे वकील ॲड.कुंदन मुंबईकर

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१८१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०३/२०२२

१) श्रीमती.रतन नथुराम थळी
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.हेमचंद्र नथुराम थळी
वय : २५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.जयवंत नथुराम थळी
वय : २४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
अर्जदार क्र.१ ते ३ सर्व रा.साई मंदिर समोर,
हनुमान गल्ली, कांजूरमार्ग, ईस्ट मुंबई ४०००४२ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

वरील नमूद अर्जदार यांनी कै.नथुराम मधुकर थळी यांचा वारस दाखला मिळणेकरिता सदरचा दिवाणी चौकशी अर्ज या मे.कोर्टात दाखल केला आहे. कै.नथुराम मधुकर थळी ह्यांचा मृत्यू हा दि.१०/०५/२०१० रोजी झाला. तर त्यांची आई कै.द्वारकाबाई मधुकर थळी हिचा मृत्यू दि.२३/१२/२०१० रोजी मयत झालेली आहे. तर त्यांचे वडील कै.मधुकर महादू थळी ह्यांचा मृत्यू दि.०१/११/२००० रोजी झालेला आहे. कै.नथुराम मधुकर थळी यांचे मालकीची ताबेकब्जातील व वहिवाटीतील मौजे चिखली भोम, ता.उरण, जि.रायगड येथे मिळकत होती व आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मौजे : चिखली भोम, ता.उरण, जि.रायगड**

| क्र. | मौजे | सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर. | पो.ख. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | चिखली भोम | ८/१ | ०.३२.०० | ०.०२.०० | ४.५० |

वरील नमूद मिळकतीचे सातबारा सदरी कै.नथुराम मधुकर थळी ह्यांची वारस नोंद होणेकरिता अर्जदार यांनी कै.नथुराम मधुकर थळी ह्यांचे हिस्सा-पुरता यांचा वारस दाखला मिळणेकरिता सदरचा चौ.अर्ज केला आहे. सदर चौकशी अर्जाच्या कामी अर्जदार यांनी केलेल्या मागणीबाबत जर कोणाला हरकत घ्यायची असेल तर ती त्याने सदरची नोटीस जाहीर झाल्यापासून १ महिन्याच्या आत पनवेल येथील सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात घेण्याची आहे. १ महिन्यानंतर आलेल्या हरकतीला फेटाळण्यात येईल याची तमाम जनतेने दखल घ्यावी.

सही/- क.लिपीक दि.न्याया. उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्याया. उरण

---

अर्जदाराचे वकील
ॲड.मेहबुब गै. पटेल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात

क्रिमिनल चौ.अर्ज क्र.८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२३/०२/२०२२

श्री.राजन अशोक शर्मा
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.४०४, प्लॉट नं.२१०, सेक्टर २३,
उलवे, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र — अर्जदार

विरुद्ध

मा.ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत वहाळ
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांचा मुलगा कु.राज राजन शर्मा याचा जन्म दि.११/१०/२०२० रोजी मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील ओम साई हॉस्पिटल येथे झालेला आहे.

वरील अर्जदार यांचा मुलगा कु.राज राजन शर्मा ह्याचा जन्म दि.११/१०/२०२० रोजी मौजे : उलवे, ता.पनवेल येथे ओम साई हॉस्पिटल येथे झाला आहे असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदाराने यांनी या मे.कोर्टात कु.राज राजन शर्मा याचा जन्मदाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. कु.राज राजन शर्मा याच्या जन्माबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांना जन्मदाखला देण्याची ताबडतोब कार्यवाही करेल.

आज दि.११/१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत ही जमिनीचे मालक नामे १) श्री.शंकर माया कासुकर २) श्री.रोहित रोहिदास कासुकर ३) कु. अंकिता रोहिदास कासुकर ४) श्रीम.पंचशिला प्रकाश कासुकर ५) श्री.कुणाल प्रकाश कासुकर ६) श्रीम.सुप्रिया हितेंद्र कासुकर ७) श्रीम.अपूर्वा प्रकाश कासुकर ८) श्रीम.प्रणोती प्रकाश कासुकर सर्व रा.दादरपाडा, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बेलोंडाखार, ता.उरण, जि.रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ६८ | ११ | ०-१०-१० पो.ख.०-०३-३० एकूण ०-१३-४० | १.०० |

वर नमूद जमीन मिळकतीपैकी दहा गुंठे मिळकत आमचे अशिल खरेदी करणेचे विचारात असून सदर मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारे हितसंबंध, अधिकार, उदा, पोटगी, लिज, भाडेपट्टा, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, देणगी, हक्कपत्र, साठेकरार, खरेदीखत, अदलाबदलपत्रक किंवा अन्य कोणाचाही दस्ताने हक्क व अधिकार असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत खाली नमूद पत्यावर लेखी हरकती योग्य त्या कागदपत्रासह नोंदविणेच्या आहेत. सदरच्या हरकती मुदतीत न आल्यास आमचे अशिल वर नमूद मिळकतीपैकी १० गुंठे जागेचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकती बंधनकाकर राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड.कुंदन नारायण मुंबईकर**
**पत्ता : वेश्वी, पो.दिघोडे,**
**ता.उरण, जि.रायगड**

---

श्री.सोनावणे साहेब

अर्जदारचे ॲड.श्री.मंगेश एम.भोंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१९५८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०२/२०२२

१) श्रीमती.शोबा जयराम शेट्टी
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.कपल जयराम शेट्टी
वय : ४० वर्षे, धंदा : व्यवसाय
नं.१ व २ रा.डी.८०३/८०४, अशोक टॉवर, डॉ.एस.एस.
राव रोड, गांधी हॉस्पिटलसमोर, परेल, मुंबई-४०००१२
३) सौ.डिम्पल प्रमल शेट्टी
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.प्रवीण निलाया, टिल्लर २ क्रॉस,
कारकल्ला, उडपी, कर्नाटका ५७४१०४ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, श्री.जयराम कोरगा शेट्टी हे दि.०३/१२/२०२० रोजी मृत्यू पावले असून, त्यांचे खालील वर्णनाचे परवान्याबाबत सक्सेशन दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

मौजे : भिंगारी, पो.काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड येथील, कपल रेस्टॉरन्ट ॲण्ड बार या हॉटेलचे खालील वर्णनाचे परवाने आहेत.

अ) FORM F.L.III (See rule 45) नुसार दारु विक्रीबाबत नं.२८०/२००३-२००४ (नवीन नंबर १८१/२०२०-२१) द्वारे मिळालेला परवाना.

ब) (Form E) PERFORMANCE LICENCE (Rule 102) (For fee vide Rule 196) नुसार ऑर्केस्ट्रा चालू करणेबाबत No.CP/NM/LB-I/3 of 2013 द्वारे मिळालेला परवाना.

ब) (Form D) PERFORMANCE LICENCE (Rule 93) (For fee vide Rule 194) नुसार ऑर्केस्ट्रा चालू करणेबाबत No.CP/NM/LB-I/3 of 2013 द्वारे मिळालेला परवाना.

अर्जदार हे कै.जयराम कोरगा शेट्टी यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस सक्सेशन दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.११/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्याया, पनवेल

---

मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदारतर्फे वकील : ॲड.श्री.सुरज बळीराम गोंधळी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.२०६८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०३/२०२२

१) सौ.पुष्पा किशोर पाटील
वय : ४१ वर्षे, धंदा : घरकाम
रा.घोट गांव, पो.घोटकॅम्प, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.जयमाला शिवदास पाटील
वय : ३४ वर्षे, धंदा : घरकाम
रा.नारीवली, पो.वाकलण, तालुका व जिल्हा : ठाणे
३) श्री.दिपक एकनाथ पाटील
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.अमर एकनाथ पाटील
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
क्र.३ व ४ रा.तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या शेतजमिनीच्या मिळकती, कै.निराबाई एकनाथ पाटील व अन्य सहहिस्सेदार यांचे मालकीच्या, ताबेकब्जातील व कसवणुकीतील होत्या. सदर मिळकती ह्या शासनातर्फे सिडाकोने नवी मुंबईचे नवीन शहर तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक प्रकल्पाकरिता संपादीत केल्या आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|
| १३८ | ४०/५+८ | ०-९३-० |
| | १३३/३ | ०-४५-७ |
| | १३८/५ | ०-२१-० |
| | १६१/० | ०-२८-८ |
| १३५ | १६२/० | ०-१२-४ |
| | १६३/१०/ब | ०-२०-५ |
| | १६३/८/२/ब | ०-२०-० |
| | १६७/१ | ०-२०-७ |
| | ३६/६ | ०-४८-४ |
| | ४०/१९ | ०-३५-० |

कै.निराबाई एकनाथ पाटील ह्या दि.०४/०९/२०२१ रोजी मृत्यू पावल्या असून, त्यांना अर्जदार क्र.१ व २ ह्या विवाहित मुली आणि अर्जदार क्र.३ व ४ हे मुलगे, असे कायदेशीर वारसदार आहेत. सदर मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार क्र.१ ते ४ हे कै.निराबाई एकनाथ पाटील यांचे, कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास, ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.११/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.श्री.राव साहेब कोर्ट

ॲड.अनिरुद्ध गो. तुळसणकर, पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२०६३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२/३/२०२२

१) श्रीमती.फहमीदा महंमद अय्युब पटेल
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१३१, वरचा मोहल्ला, तळोजे गाव,
तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
२) महमद शफी महमद युसुफ पटेल
वय : ७० वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.११९/१, भटीला रोड, अक्सा मस्जिद जवळ,
तळोजे पाचनंद, तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
३) मुजमील अब्दुल मजीद पटेल
वय : ३४ वर्षे, धंदा : शेती व व्यापार
रा.घर नं.१३१/२, तावली मोहल्ला, तळोजे पाचनंद,
तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
४) सरफराज अब्दुल मजीद पटेल
वय : ३७ वर्षे, धंदा : शेती व व्यापार
रा.घर नं.१३१/२, तावली मोहल्ला, तळोजे पाचनंद,
तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
५) शहनाज अब्दुल मजीद पटेल
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१३१/२, तावली मोहल्ला, तळोजे पाचनंद,
तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
६) तस्नीम बेगम जुल्फीकारअली मुल्ला
वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१२९०, मन्नन कॉलनी, तळोजे पाचनंद,
तळोजा मजकूतर, ता.पनवेल, जि.रायगड
७) सबीना जुबेर पटेल
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा. घर नं.१३८, जामा मस्जिद जवळ, तळोजे पाचनंद,
तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
८) नाजीया तोसिफ मुल्ला
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रा. घर नं.१३८, जामा मस्जिद जवळ, तळोजे पाचनंद,
तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
९) महमद अमिन महमद युसूफ पटेल
वय : ६३ वर्षे, धंदा : शेती
रा. घर नं.५९, दिवाण मोहल्ला, तळोजे पाचनंद,
तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
१०) अब्दुल वहाब महमद युसूफ पटेल
वय : ६२ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.८६६, तावली मोहल्ला, तळोजे पाचनंद,
तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
११) अब्दुल रशीद महमद युसूफ पटेल
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.१३१, वरचा मोहल्ला, तळोजे पाचनंद,
तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
१२) रियाज महमद युसूफ पटेल
वय : ५१ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.४८९/२, उर्दू शाळा रोड, मदनी मस्जिद,
तळोजे पाचनंद, तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
१३) अतिका खानम शौकत पटेल
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मन्नन कॉलनी, ओवे रोड, मदनी मस्जिद जवळ,
तळोजे पाचनंद, तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
१४) समीना अयुब नमरे
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.४८९, ताज राईसमिल रोड, मधली मजिस्द जवळ,
तळोजे पाचनंद, तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
१५) खादीजा अमिन पटेल
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.६६६, मदानी मस्जिद जवळ, तळोजे पाचनंद,
तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार क्रं.१ यांचे पती आणि अर्जदार क्रं.२, ९ ते १५ व अर्जदार क्रं.३ ते ८ यांचे पुर्वगामी पै.अब्दुल मजिद महंमद युसूफ पटेल यांचा सख्खा भाऊ पै.महमद अयुब महमद युसूफ पटेल हे मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे दि.०४/१२/२०१६ रोजी पैगंबरवासी झाले आहेत. पै.महमद अयुब महमद युसूफ पटेल यांची आई पै.खातुनबीबी म.युसूफ पटेल या देखील दि.२२/०९/२०११ रोजी पैगंबरवासी झाल्या आहेत. पै.महमद अयुब महमद युसूफ पटेल यांचे मृत्यूपश्चात त्यांना मुस्लीम कायद्यांतील तरतुदीनुसार अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत.

श्रीमती.फहमीदा महंमद अय्युब पटेल वगैरे ह्यांनी पै.महमद अयुब महमद युसूफ पटेल यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. पै.महमद अयुब महमद युसूफ पटेल यांचे पुर्वगामी पै.खातुनबीबी जवजे म.युसूफ पटेल यांच्या नावे असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

अ) मौजे : तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन

| अनु क्रं. | सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्र चौरस मीटर | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| १ | ६२८ | ५८.० | अ |

सदरहू मिळकतीवर पै.खातुनबीबी जवजे म.युसूफ पटेल यांच्या नांवे ग्रामपंचायत घर मिळकत क्रं.१३४ क, अशी मिळकत आहे. त्यामध्ये अर्जदार राईस मिलचा व्यवसाय करीत आहेत.

ब) मौजे-खैरणे खुर्द, ता. पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन:-

| अनु क्रं. | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| १ | ५५ | १२२०.७० | १२२०७.०० |

क) मौजे:करवले, बुद्रुक, ता. पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन:-

| अनु क्रं. | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| १ | २४/५ | ००-१४-१० | ०.२५ |

ड) पै. महमद अयुब महमद युसुफ पटेल यांचे पुर्वगामी पै. खातुनबीबी जवजे म. युसुफ पटेल यांच्या नावे असलेल्या जमीन मिळकती मौजे-तळोजा पाचनंद, ता. पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं. १४२/२ आणि १४२/१ब या मिळकती महाराष्ट्र शासनाने संपादनात समाविष्ट केलेल्या आहेत. सदरहू मिळकतींचे संपादनाचे मोबदल्यापोटी पै. महमद अयुब महमद युसुफ पटेल यांचे पुर्वगामी पै. खातुनबीबी जवजे म. युसुफ पटेल यांस आदमासे ७०० चौ.मी क्षेत्राचा भुखंड मिळण्याची पात्रता होती. त्यापैकी मे. सिडको लि. यांनी नोड खारघर(ओवे), मध्ये सेक्टर क्रं. २७, भुखंड क्रं. ५१, क्षेत्र ६५० चौ.मी. अशा वर्णनाचा भुखंड दि. ०५/१०/२००५ रोजीचे वाटपपत्राने वाटप केलेला आहे. उर्वरीत ५० चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड अद्याप पै. महमद अयुब महमद युसुफ पटेल यांचे पुर्वगामी पै. खातुनबीबी जवजे म. युसुफ पटेल यांचे नांवे इरादित/वितरीत होणार आहे. त्याबाबत मे. सिडको लि यांनी दि. ०८/१२/२०१५ रोजीचे पत्रं जारी केलेले आहे.

पै. महमद अयुब महमद युसुफ पटेल यांचे नावे असलेल्या मौजे-तळोजा पाचनंद, ता. पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन:-

| अनु क्रं. | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| १ | २२२ | ०-०९-२० | ०.२८ |

सदरहू मिळकतीवर पै. महमद अयुब महमद युसुफ पटेल यांच्या नांवे ग्रामपंचायत घर मिळकत क्रं. ९८२, अशी मिळकत आहे.

पै. महमद अयुब महमद युसुफ पटेल वगैरे यांचे सामाईक मालकी हक्कांत व नावे असलेल्या मौजे-तळोजा पाचनंद, ता. पनवेल, जि.रायगड येथील मिळकती महाराष्ट्र शासनाने संपादनात समाविष्ट केलेल्या आहेत. सदरहू मिळकतींचे संपादनाचे मोबदल्यापोटी मे. सिडको लि. यांनी नोड तळोजा-VI मध्ये सेक्टर क्रं. १४, भुखंड क्रं. १४, क्षेत्र ४० चौ.मी. अशा वर्णनाचा भुखंड दि. १५/०३/२०१२ रोजीचे इरादापत्राने इरादित केलेला आहे.

सदरहू मिळकतीमध्ये पै. महमद अयुब महमद युसुफ पटेल यांचा सामाईकांत हिस्सा आहे.

वर श्रीमती. फहमीदा महंमद अय्युब पटेल वगैरे हे पै. महमद अयुब महमद युसुफ पटेल यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट श्रीमती. फहमीदा महंमद अय्युब पटेल वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर पै. महमद अयुब महमद युसुफ पटेल यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ११/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## कु. उन्नती विकास साळवीने जिंकले मिस स्टायलिन स्टार इंडिया २०२२ चे विजेतेपद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर येथे राहणाऱ्या उन्नती विकास साळवी हिने नुकत्याच पुणे येथे पार पडलेल्या रॉयल कॅनॉट बोट क्लब येथील शोमध्ये मिस स्टायलिन स्टार इंडिया २०२२ चे विजेतेपद पटकावल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



खारघर, येथे राहणारी १९ वर्षांची कु. उन्नती विकास साळवी ही येरळा मेडिकल कॉलेज, खारघर येथे आयुर्वेदाची विद्यार्थीनी आहे. तिचे वडील पोलिस खात्यात अधिकारी आहेत. भावी काळात तिला सर्जन होण्याची महत्त्वाकांक्षा आहे. आयएनआयएफडी पनवेल येथे सोल सेन्सेशन ३. साठी शोस्टॉपर आहे. मिस मेस्मेरिक क्वीन इंडिया २०२१ मध्ये 'प्रेक्षणीय डोळे' चे उपशीर्षक आणि मिस स्टायलिन स्टार इंडिया २०२२ चे विजेतेपद जिंकले. हा शो नुकताच रॉयल कॅनॉट बोट क्लब, पुणे येथे झाला. त्याचबरोबर तिने इतर अनेक फॅशन शोमध्ये सहभाग घेतला असून त्यातसुद्धा प्राविण्य मिळविले आहे. या तिच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## दोन अल्पवयीन मुलींचे अपनयन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा परिसरातील रोहिंजण गाव व नावडे गाव या परिसरात राहणाऱ्या दोन १६ वर्षीय अल्पवयीन फुस लावून अपहरण केल्याची घटना घडली आहे.

रोहिंजण गाव या ठिकाणी १६ वर्षीय मुलीला तिच्या राहत्या घरातून कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून अपहरण केले आहे. सदर मुलगी अंगाने मजबूत, रंग सावळा, उंची ५ फूट, चेहरा गोल, केस काळे मध्यम वाढलेले, डोळे काळे असून अंगात पंजाबी हिरव्या रंगाचा ड्रेस घातला आहे व तिला हिंदी भाषा अवगत आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे सपोनि सोपान नांगरे यांच्याशी संपर्क साधावा. तर दुसऱ्या घटनेत नावडे गाव येथे राहणाऱ्या १६ वर्षीय ५ महिने या मुलीचे सुद्धा कायदेशीर रखवालीतून फुस लावून अपहरण केले आहे. ती अंगाने मध्यम, उंची ४ फुट ८ इंच, रंग गोरा, चेहरा उभट, केस काळे वाढलेले, डोळे काळे असून तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. तसेच तिच्या अंगावर गुलाबी रंगाचा पंजाबी ड्रेस आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे सपोनि सोपान नांगरे यांच्याशी संपर्क साधावा.

# किरवली गावातील नळपाणी योजना बंद ; ग्रामस्थांना पाणी विकत घेण्याची वेळ

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील किरवली ग्रामपंचायत मधील किरवली गावातील नळपणी योजना जुलै २०२१ पासून बंद आहे. त्यामुळे किरवली गावातील ग्रामस्थांना पिण्याचे पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. त्यामुळे गावात रस्त्यांवर पाणीच पाणी आणि ओला झालेला रस्ता यामुळे गावातील महिलांनी ग्रामपंचायतला जाब विचारण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय गाठले.

कर्जत शहरापासून अर्ध्या किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या किरवली ग्रामपंचायत मधील किरवली गावाची नळपाणी योजना बंद आहे. उल्हासनदीवरून पाणी उचलून गावात आणण्यात आले आहे.१७ वर्षांपूर्वी हि नळपाणी योजना करण्यात आली होती आणि या नळपाणी योजनेची उल्हासनदीवर चेडोबा मंदिराच्या मागे असलेली विहीर जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टी मध्ये कोसळली आणि त्यावेळी विहिरीच्या बाहेर असलेली वीज पंप



देखील विहिरीत कोसळला होता. त्यामुळे पावसाळ्यापासून किरवली गावाची नळपाणी योजना बंद आहे.किरवली गावात पिण्याचे पाण्यासाठी खासगी बोअरवेल असून त्यांचा फायदा ठरविक ग्रामस्थांना होत असतो.

मात्र निम्म्या ग्रामस्थांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याने ग्रामस्थांना विकत पाणी घ्यावे लागते. त्यासाठी गावात काही खासगी ट्रँकर पाणी विकण्यासाठी येत असतात.मात्र रस्त्यात ट्रँकर उभे करून पाणी दिले जाते आणि त्यामुळे ट्रँकर मधील अर्धे पाणी रस्त्यावर वाहून जात असते. त्याचा परिणाम गावातील सर्व रस्ते हे वाहून भरून वाहत असतात आणि सतत चिखलमय झालेले ते रस्ते असतात.

गावात पिण्याचे पाणी नाही आणि त्याचवेळी विकत पाणी घेत असताना त्यातील अर्धे पाणी रस्त्यावर पडत असल्याने रस्त्यांवर होणारा चिखल याकडे देखील ग्रामपंचायत प्रशासन लक्ष देत नाहीत.हि नेहमीची समस्या बनल्याने किरवली ग्रामस्थांनी आज १० जानेवारी रोजी किरवली गावातून देऊळवाडी येथे असलेले ग्रामपंचायत कार्यालय गाठले.

त्यावेळी सरपंच संतोष सांबरी यांनी महिलांना ग्रामपन्चायत कडून नळपाणी योजना कार्यन्वित करण्यासाठी करीत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. त्यावेळी महिलांनी २५७ महिलांच्या सह्यांचे निवेदन ग्रामपन्चायत ला दिले. ग्रामपंचायतने १५ दिवसात नळपाणी योजना सुरु होईल असे आश्वासन दिले आहे.मात्र किरवली गावातील आपला संताप व्यक्त करीत नळपाणी योजना असून काय फायदा आहे? तसेच रस्त्यावरील चिखल देखील ग्रामपंचायत काढत नसल्याने आपला संताप यावेळी केला.

## काशिद बीच समुद्रात बुडणाऱ्या तीन पर्यटकांना जीवदान

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

पर्यटनात प्रसिद्ध असलेल्या मुरुड तालुक्यातील काशिद बीचवर पुणे–कात्रज येथून मौजमजा करण्यासाठी आलेल्या पोहोचण्यासाठी समुद्रात गेले असता बुडणा–या तीन पर्यटकांना पोलीस शिपाई प्रशांत लोहारे यांनी वेळीच दाखविलेल्या समयसूचकते मुळे जीवदान मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.

काशिद बीच वर पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी नुकत्याच रविवारी दुपारी बारा ते साडेबारा दरम्यान पुणे–कात्रज येथून पाच पर्यटक खाजगी वाहनाने आले होते.त्यापैकी श्रीकांत नौना डाके (२७), गणेश प्रकाश पाटील (२३) व जगन सोनावणे (२८) तिघे समुद्रात पोहाण्यासाठी उतरले.पाण्यात पोहत असता समुद्रातील पाण्याचा अंदाज न आल्यामुळे बुडू लागले.रविवार असल्याने पर्यटकांची गर्दी होती.अशावेळी येथे कर्तव्यावर असलेले पोलिस शिपाई प्रशांत लोहारे यांच्या चाणाक्ष नजरेने गांभीर्य ओळखून ५० मीटर धावत शिट्टी वाजवत येऊन किना–यावरील बोटचालक व जीवरक्षक यांचे लक्ष वेधून बुडणा–या तीघांची कल्पना दिली.

क्षणाचाही विलंब न करता समुद्रातील बोटचालक रोहन खोपकर, संजय वाघमारे, जीवरक्षक राकेश रक्ते आदींनी तात्काळ समुद्रात झेप घेऊन प्रथम बुडणा–या नयन मुरलीधर सोनावणे याला किना–यावर आणले तर श्रीकांत डाके व गणेश पाटील या दोघांना राकेश रक्ते व संजय वाघमारे या जीवरक्षकांनी बेशुद्धावस्थेत पाण्यातून बाहेर काढले.मुरुड पो–लीस निरीक्षक नितीन गवारे यांनी घटना स्थळी पोहचून पुढील कार्यवाही करण्यात आली.काशीद बीच समुद्रात बुडणा–या तीन पर्यटकांना जीवदान दिल्याने बोटचालक पोलिस व जीवरक्षक यांचे कौतुक होत आहे.

# शासनाचा विशेष प्रशासकीय घटक म्हणून माथेरानचे पर्यटन सुरू ठेवा

### नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे



**दै.रायगड नगरी । माथेरान**

०८ जानेवारी २०२२ रोजी केंद्र सरकार आणि राज्य सरकारने प्रसारित केलेल्या नवीन नियमावली नुसार स्थानिक पर्यटक स्थळांविषयी काही निर्बंध जाहीर केले आहेत. माथेरानच्या नागरिकांचे उत्पनाचे साधन हे पर्यटकांवर आधारित असल्याने हे पर्यटन स्थळ जर बंद करण्यात आले तर इथल्या नागरिकांवर उपासमारीची वेळ येऊ शकते.याची दक्षता घेत आज माथेरानच्या कार्यसम्राट (मा. नगराध्यक्षा ) प्रेरणा प्रसाद सावंत यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. उध्दव ठाकरे आणि इतर मान्यवरांना निवेदन सादर केले आहे त्या निवेदनाची प्रत माथेरान शिवसेना संपर्क प्रमुख तथा गटनेते प्रसाद सावंत यांनी मावळचे लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग अप्पा बारणे यांना आज दिली. जिल्ह्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या अधिपत्याखाली एखाद्या पर्यटन स्थळास स्वतंत्र प्रशासकीय घटक घोषित करू शकतील असे निर्देश देण्यात आलेले आहेत त्या अनुषंगाने माथेरानचे पर्यटन सुरू ठेवण्यास आपले स्तरावर प्रयत्न व्हावेत तसेच युवासेना प्रमुख व पर्यटन व पर्यावरण मंत्री, मा. आदित्य ठाकरे यांच्या सोबत विचारविनिमय करून लवकरच तसे आदेश प्राप्त करू घेण्याचा प्रयत्न करू असे खासदार यांनी सांगितले. या प्रसंगी कर्जतचे माजी नगरसेवक, संतोष पाटील हे खासदार यांच्या थेरगाव या निवासस्थानी उपस्थित होते.

> मागील वर्षी २५ जुलै रोजी शासनाचा विशेष प्रशासकीय घटक म्हणून माथेरानचे पर्यटन सुरू ठेवणे बाबत निवेदन दिल्यावर विशेष बाब म्हणून माथेरानला अनलॉक केले होते. हे एकमेव असे पर्यटनस्थळ आहे की इथे पर्यटन हीच शेती असून अन्य काही व्यवसाय उपलब्ध नाही यासाठी या स्थळाची भौगोलिक परिस्थिती पाहून अनलॉक करून हे स्थळ पर्यटकांसाठी खुले करावे.
>
> **प्रेरणा सावंत, नगराध्यक्षा**

## श्री वर्धमान स्थानकवासी जैन मेवाड नवयुवक मंडळ आयोजित मोफत आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री वर्धमान स्थानकवासी जैन मेवाड नवयुवक मंडळ उपसंघ पनवेल आयोजित मोफत आरोग्य शिबीर पनवेल येथील मालडूंगे गावात आयोजित करण्यात आले होते, शिबिरास आजू बाजूच्या आदिवासी वाड्यां मधून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सदर शिबिराचा आजूबाजूच्या गावांमधून जवळपास दोनशे लोकांनी लाभ घेतला, या मोफत आरोग्य शिबिरात रक्तदाब (बी.पी.) मधुमेह (शुगर) इ.सी.जी तसेच सर्व साधारण तपासणी करण्यात आली, या शिबिरास डॉ. निखिल पिसे,डॉ. स्वप्नाली पवार, डॉ.ममता शिंदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



श्री वर्धमान स्थानाकवासी जैन मेवाड नवयुवक मंडल उपसंघ पनवेलचा अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सहभाग असून नागरिकांच्या विविध समस्यांचे निवारण तसेच प्रत्येक वर्षी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करून सामाजिक कार्यात बहुमूल्य योगदान देत आहेत. सदर शिबीर यशस्वी होण्यासाठी मेवाड उपसंघ पनवेल प्रमुख शैलेंद्र खेरोदिया, अध्यक्ष ललित चंडालिया, महामंत्री महावीर सोलंकी, उपप्रमुख दिलीप खेरोदिया, रोशनलाल ईदोदिया, उपाध्यक्ष जयंती परमार, मार्गदर्शक दिलीप संघवी, शिवसेना मा.शहर प्रमुख सुनीत ठक्कर, नवयुवक मंडल प्रमुख जितेश मारू, अध्यक्ष प्रमोद सुराणा, महामंत्री मुकेश इंटोडिया, कोषाध्यक्ष रिखभ बनवट, विजय श्रीमाल, उमेश कुमठ, विनोद वडालमिया, सुनिल लोढा, विनय बम्ब, लोकेश कोचेटा, अंकुश हिंगड, राजेश सांखला, महावीर संचेती, महेंद्र कुकडा, ललित इंटोदिया, आदी नवयुवक मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सुकेळी येथील वरदायणी धबधबा व परिसराला पर्यटन स्थळ बनविण्यासाठी मनसेचे निवेदन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

मुंबई–गोवा महामार्गावरील सुकेळी हद्दीमधिल निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या वरदायणी धबधबा व तेथिल परिसराला पर्यटन स्थळ बनविण्यात यावे व पर्यटन स्थळ म्हणून घोषित करावे यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रोहा तालुका सचिव साईनाथ धुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ऐनघर ग्रामपंचायतीला नुकतेच एक निवेदन देण्यात आले आहे.



या निवेदनात म्हटले आहे की, महामार्गापासुन काही अंतरावरच असलेल्या सुकेळी येथील वरदायणी धबधब्यावर पावसाळ्यात मुंबई, ठाणे, पुणे तसेच आजूबाजूच्या परिसरातील अनेक पर्यटक आंनद लुटण्यासाठी येत असतात. परंतु या धबधब्यावर गाड्या जात नसल्यामुळे पर्यटकांना पायी चालत जावे लागते. अनेक पर्यटक हे संकेतस्थळावरुन याची माहिती काढतात आणि त्या ठिकाणी येत असतात. परंतु याचा येथिल स्थानिकांना कोणताच फायदा होत नसतो. रायगड जिल्ह्यात अशी अनेक पर्यटनस्थळे आहेत. त्यातीलच एक लोणावळा या ठिकाणी अनेक पर्यटक आंनद लुटण्यासाठी येत असतात. त्यामुळे लोणावळा नगरपालिकेचे वार्षीक उत्पन्न हे १० कोटी रुपयांपर्यंत जाते. तसेच या ठिकाणी अनेक व्यवसायांतुन येथिल जनतेच्या रोजगारात भर पडली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीला देखील भरघोस उत्पन्न मिळायला लागले आहे.

त्यामुळेच या गोष्टींचा विचार करीत ऐनघर ग्रामपंचायतीने देखिल या धबधब्याच्या ठिकाणी योग्य त्या उपाययोजना करुन पंचायतीचे भरघोस उत्पन्न वाढवावे. या उपाययोजनांमध्ये महामार्गावर दोन्ही बाजूला सुसज्ज ठळक जाहिरात होईल असा फळक लावावा, २०० गाड्या पार्किंग होऊ शकतील अशी जागा उपलब्ध करून घ्यावी व पार्किंगसाठी रितसर पावती आकारावी, ग्रामस्थांना श्रमदानासाठी प्रवृत्त करावे व योग्य तो मोबदला द्यावा, फक्त पंचायतीमधिल जनतेला या ठिकाणी नाष्टा, जेवण अशा अनेक खाण्या पिण्याच्या वस्तू विकण्यासाठी पवृत्त करावे व रोजगार उपलब्ध करून दिला म्हणुन पावती आकारावी, बसण्यासाठी आसने,जागा, विश्रामगृहे बांधावी. धबधब्याकडील जाण्याच्या मार्गावर रस्ता पुनर्वसन म्हणून निधी आकारावा. २० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त घेणं योग्य होतील.

या सर्व गोष्टींची पूर्तता करून भविष्यात वरदायणी धबधबा ऐनघर ग्रामपंचायतीसाठी वरदान ठरो व वरदायणी धबधब्याचे नाव हे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचावे अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

# श्रमिकांच्या उपजीविकेसाठी पर्यटनक्षेत्र माथेरान अनलॉक करा : राकेश कोकळे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील बहुतांश लोक ह्यांचे केवळ हातावर पोट असल्याने या कष्टकरी श्रमिकांच्या उपजीविकेसाठी पर्यटनक्षेत्र माथेरान अनलॉक करा या आशयाचे निवेदन धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे यांनी नगरपरिषदेच्या उत्तम प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांना देत मागील वर्षी ज्याप्रमाणे एक विशेष बाब म्हणून हे पर्यटनस्थळ सुरू ठेवले होते. त्याच पार्श्वभूमीवर इथल्या गोरगरीब अन कष्टकरी श्रमिकांच्या रोजगारासाठी शासकीय नियमांचे पालन करत अन लॉक करावे असे राकेश कोकळेंनी आपल्या निवेदनाद्वारे शासनाला साकडे घातले आहे.



माथेरान मधील सर्वांचे जीवनमान हे पर्यटनावर अवलंबून असते. पर्यटन शेतीवर लहानमोठ्या व्यावसायिक तसेच घोडेवाला, हातरीक्षा चालक आणि मोलमजुरी करणारे हमाल यांना मागील दोन वेळा झालेल्या लॉक डाऊन काळात खूपच अडचणींना तोंड द्यावे लागले होते. युवा वर्गाला सुध्दा हातगाडी ओढण्याची अति कष्टदायक कामे नाईलाजाने करावी लागली होती. त्याचवेळी राकेश कोकळेंनी आपल्या ओळखीच्या काही दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून अनेकदा घोड्यांचे खाद्य उपलब्ध केले होते. त्यामुळे एकप्रकारे मोठा आधार प्राप्त झाला होता तर या अनेकांना जीवनावश्यक वस्तूंच्या किट्स सुध्दा मुंबई पुण्यातील काही दानशूर लोकांमार्फत गरजवंताला वाटप करण्यात आले होते. इथला सर्वसामान्य नागरिक हा स्वाभिमानी असल्याने आपल्या स्वयंकष्टाची भाकरीच मिळाली पाहिजे यासाठी अपार कष्ट करत असतात. त्यासाठी ह्या स्थळावर लॉकडाऊन करू नये इथे अन्य कोणत्याही प्रकारचा जोडधंदा अथवा कंपन्या कारखाने नाहीत. शेती सुध्दा इथे होत नाही त्यामुळे पर्यटन हीच एकमेव शेती असून कष्टकरी लोकांच्या उपजीविकेसाठी माथेरान मध्ये येणाऱ्या पर्यटकांना ज्यांचे दोन डोस पूर्ण झाले आहेत अशांना प्रवेश देण्यात यावा जेणेकरून सर्वानाच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील असे निवेदनात नमूद केले असून याच्या प्रति जिल्हाधिकारी रायगड, पालकमंत्री, पर्यटनमंत्री यांनाही राकेश कोकळे यांनी दिले आहे. यावेळी प्रशासक सुरेखा भणगे यांनी आपलल्या निवेदनातील म्हणणे वरिष्ठांना नक्कीच कळवू आणि यावर काहीतरी सकारात्मक प्रतिसाद नक्कीच मिळेल असे आश्वासन दिले.

## कृष्णा पाटील, मुकुंद गावंड यांच्या माध्यमातून शाळेला पंखे भेट

**दै.रायगड नगरी । उरण**

पिरकोन गावात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात दहागाव माजी विद्यार्थी अध्यक्ष कृष्णा पाटील व उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्या सहकार्यांने हायस्कूलला चार पंखे भेट देण्यात आले.

यावेळी शाळेला पंखे बसवण्याचे मोफत काम प्रभाकर ठाकुर यांनी त्वरित करून दिले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका वेटम मॅडम, गुरूवर्य भगत सर, एस.एन. पाटील मॅडम, अे.अे. पाटील मॅडम, पिरकोन गावातील सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. भगत सरांनी शाळेतर्फे दहागाव माजी विद्यार्थी अध्यक्ष कृष्णा पाटील, उपाध्यक्ष मुकुंद गावंड व प्रभाकर ठाकुर यांचे शाळेतील सर्व स्टाफ, शाळेतील मुलामुलींच्या वतीने आभार मानले.

## पोलीस बंदोबस्त नसल्याने विना मास्क फिरणाऱ्यांवर कारवाई करताना येतात अडथळे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विना मास्क फिरणाऱ्या नागरिकांवर पनवेल परिसरात कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे. मात्र यावेळी शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोबत पोलीस बंदोबस्त नसल्याने त्यांना ही कारवाई करताना अडचणी निर्माण होत आहेत.

कोरोनाचे संकट दिवसेंदिवस गडद होत चालले आहे. दिवसागणिक पनवेल मध्ये देखील कोरोनाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात सापडू लागले आहेत. पनवेल तालुका आणि महापालिका हद्दीत नागरिक विना मास्क फिरत आहेत. शासनाने तोंडावर मास्क लावण्यास सांगितलेले आहे ,मात्र तरीदेखील काही नागरिक विना मास्क फिरत आहेत. त्यामुळे विना मास्क फिरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाते. पनवेल तालुक्यात ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी यांच्या वतीने कारवाई सुरू आहे. मात्र त्यावेळेला त्यांच्यासोबत पोलीस बंदोबस्त नसल्याने दमदाटी, शिवीगाळी केली जात असल्याचे समोर आले आहे.

मास्क न वापरणारे नागरिक बऱ्याच वेळेला तलाठी, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी यांच्यासोबत हुज्जत घालतात. काही वेळेला त्यांचं भांडण देखील होते, तर बरेच जण शिवीगाळ देखील करतात.

त्यामुळे यांच्यासोबत पोलीस असले तर अशा विना मास्क फिरणार्यांवर नक्कीच वचक बसेल व कारवाई करताना कोणताही अडथळा निर्माण होणार नाही त्यामुळे विना मास्क फिरणाऱ्यांवर कारवाई करते वेळी पोलिस बंदोबस्त असायला हवा अशी मागणी केली जात आहे.